# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही बद्दलचे विचार

**डॉ.निलेश गोकुळ शेरे,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग, जिल्हा. उस्मानाबाद.

---

**प्रस्तावना:**

कुठल्याही संकल्पनेची व्याख्या त्या संकल्पनेचा परिणाम, कारण, हेतू यासंबंधी विशिष्ट स्पष्टीकरण देत असून तिला आकृतीबंद देण्याचे काम करते. लोकशाहीबाबत "लोकांनी लोकांच्या कल्याणासाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही" अशी अब्राहम लिंकन यांनी केलेली व्याख्या सर्वज्ञात आहे. डॉ.बाबासाहेबांची व्याख्या यावर समाधानी होणार नाही. मूलभूत विचार करता त्यांची व्याख्या संपूर्ण मानवी विकासाच्या ध्येयाला कवेत घेणारी दिसून येते. ते म्हणतात की रक्तपाताशिवाय समाजाच्या सामाजिक,आर्थिक परिस्थितीत बदल घडवून आणणाऱ्या व्यवस्थेला लोकशाही म्हणावे. म्हणजेच बाबासाहेब केवळ लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सत्तेवर येण्याच्या पलीकडे जाऊन करणे असलेल्या कृतीकार्यक्रम स्पष्ट करण्याच्या दिशेने विधान करतात. सामाजिक परिवर्तनाचं एक साधन म्हणून डॉ. बाबासाहेब लोकशाहीकडे बघत असावेत म्हणूनच ही व्यवस्था यशस्वी होण्याकरता काही अटींचा उल्लेख बाबासाहेब करतात यातून त्यांचे ध्येय स्पष्ट होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीची संकल्पना:**

आज आपण ज्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्थितीतून पुढे जात आहोत, त्या स्थितीचा विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'लोकशाही' या संकल्पनेतील आशय आपण कसा गमावत आहोत, याचाच प्रत्यय येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या देशात राजकीय लोकशाहीतून सामाजिक व आर्थिक लोकशाहीची प्रस्थापना करावयाची होती. म्हणूनच ते राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत परिवर्तन व्हावे, यासाठी आग्रही होते. म्हणजेच लोकशाही प्रणालीतून त्यांना या देशातील लोकांच्या जीवनात सामाजिक व आर्थिक स्तरावर आमूलाग्र परिवर्तन घडवून आणायचे होते. केवळ निवडणुकीत लोकांना मताधिकार मिळाला म्हणून तेवढ्याने यशस्वी लोकशाही साकार होईल, असा भाबडा आशावाद त्यांच्या मनात नव्हता. कारण या देशात अगदी प्राचीन काळापासून जे एक सामाजिक वास्तव अस्तित्वात आहे, ते लोकशाही तत्त्वांना मारक आहे याची त्यांना जाणीव होती. याच पार्श्वभूमीवर लोकशाहीचा विचार करताना त्यांनी लोकशाहीचे अत्यंत मूलभूत स्वरूपाचे चिंतन वेळोवेळी प्रकट केले. २२ डिसेंबर १९५२ रोजी पुणे येथे आपल्या भाषणात बाबासाहेबांनी लोकशाहीची व्याख्या दिली ,"रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पद्धतीस लोकशाही म्हणतात". म्हणजेच डॉ.बाबासाहेब केवळ

लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सत्तेवर येण्याच्या पलीकडे जाऊन करणे असलेल्या कृतीकार्यक्रम स्पष्ट करण्याच्या दिशेने विधान करतात.

डॉ. बाबासाहेबांच्या विचारात उदारमतवादी लोकशाही दिसून येते. त्यामुळेच त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मुल्य त्यांनी सर्वकष समाज क्रांतीची व नवसमाज निर्मितीची मूलप्रेरणा मानली. जीवनविषयक आदर्श तत्वप्रणाली म्हणूनही डॉ. बाबासाहेब उदारमतवादी लोकशाहीचे स्वीकार व समर्थन करतात.बाबासाहेबांनी भारतीय समाजाच्या संदर्भात उदारमतवादी लोकशाहीच्या विचारला व्यापक परिवर्तनशीलतेचे व समाजभिमुखतेचे प्रवाही परिणाम दिले .संसदीय लोकशाही, घटनात्मक मार्ग व नितीमत्ता ,स्वतंत्र न्यायव्यवस्था आदींचा विचार व संख्यात्मक संकल्पनांचा त्यांनी पुढाकार केला .सामाजवादातील आर्थिक समतेची व न्यायाची प्रेरणा आणि नियोजनाची आवश्यकता त्यांनी स्वीकारली होती. तरीपण राजकीय लोकशाहीच्या माध्यमातून ही प्रेरणा कार्यशील केली पाहिजे, असे त्यांचे स्पष्ट मत होते

डॉ. बाबासाहेबांच्या मते "भारतीय समाजात जातिव्यवस्थेचे निर्मूलनसारख्या पायाभूत सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिल्याखेरीज राजकीय व आर्थिक सुधारणा प्रभावी व अर्थपूर्ण ठरणार नाही .त्यांनी भारतातील सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात उदारमतवादी विचारला त्यांच्या सामर्थ्याचे व मर्यादांचे भान ठेऊन नवा आशय व दिशा दिली ,स्वातंत्र्य-समता-बंधुता या उदारमतवादाच्या पायाभूत मूल्यविचारांचा विकास बाबासाहेबांच्या राजकीय विचारातच नव्हे तर एकूण विचार विश्वातच दिसून येतो. "व्यक्तीचे हक्क वा स्वातंत्र्य हे व्याक्तीविकासाचे व व्यक्तीप्रतीभेचे महत्वाचे साधन आहे हे त्यांना मान्य होते. तसेच त्यांनी हे पूर्णतः ओळखले होते की सामाजिक शक्तीकडून,संस्थाकडून अन्याय, शोषण वा दडपणूक होऊ शकते आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्य ,हक्क ,विकास व प्रतिष्टा यांना बाधा येऊ शकते .स्वातंत्र्य - समता - बंधुता या दिशेने होणारे सामाजिक परिवर्तन हेच व्यक्ती स्वातंत्र्य ,विकास व प्रतिष्ठा यांना संरक्षण देते. परिवर्तनाच्या या सामाजिक प्रेरणांना डॉ .बाबासाहेबांनी आपल्या विचारात प्राधान्य दिले. यामुळेच हे परिवर्तन पुरोगामी, विवेकनिष्ठ व सुव्यवस्थितरित्या उत्क्रांत होत असते अशी बाबासाहेबांची उदारमतवादाची धारणा होती. बाबासाहेबांच्या उदारमतवादी विचारांची चिकित्सा करतांना एक गोष्ट लक्षात येते की, उदारमतवादातील राजकीय विचार व सामाजवादातील आर्थिक समतेचा ,सामाजिक न्यायाचा विचार यांचा समन्वय घडवून आणला पाहिजे ,लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद प्रत्यक्षात आणला पाहिजे ,ही लोकशाही समाजवादाची संकल्पांना त्यांची होती.

**आदर्श लोकशाहीची सूत्रे-**

1. आदर्श लोकशाही समाज हा नेहमी गतीशील असला पाहिजे आणि समाजात होणारे बदल प्रत्येकाने परस्परांस कळवले पाहिजेत.

2.समाजात वेगवेगळ्या संस्था, समाजहितवादी मंडळे स्थापन झाली पाहिजेत. त्यांचे परस्परांशी संबंध असले पाहिजेत.त्यांनी आपल्या कामाची माहिती लोकांना दिली

पाहिजे.

3. समाजातील वेगवेगळ्या संस्था व संघटना या स्वतंत्र असल्या पाहिजेत व त्यांच्यामध्ये वेगवेगळे विचारप्रवाह असले पाहिजे. त्याबाबत यांच्यामध्ये चर्चा आणि संवाद असला पाहिजे.

थोडक्यात समाजात एक प्रकारचा वैचारिक जिवंतपणा परस्पर विचारांची देवाणघेवाण आणि परस्पर संवाद असला पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आदर्श लोकशाहीच्या सूत्रांमध्ये विविधता परस्परसंवाद विचारांची व आजारांची देवाणघेवाण आणि समाजात वेगवेगळ्या प्रकारच्या सामाजिक आणि आर्थिक संस्था स्थापन करणे यास महत्त्व दिले आहे.त्यांना परस्परात संवाद न करणारे, स्वतःला बंद कप्प्यात कोंडून घेणारे लोक नको होते. मुक्त परस्पर संवाद यावर आधारलेला नागरी समाज त्यांना भारतात स्थापन करायचा होता. असा समाज स्थापन झाला तरच आपल्याला आदर्श लोकशाही निर्माण करता येईल.

**लोकशाही यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या काही महत्वाच्या सुचना-**

भारतात लोकशाही यशस्वी करायचे असेल तर आपण कोणते संकेत पाळले पाहिजेत त्याच्या अत्यंत चांगले असे विश्लेषण बाबासाहेबांनी त्यांच्या 22 डिसेंबर 1952 रोजी पुणे बार असोसिएशनच्या ग्रंथालयाचे उद्घाटन प्रसंगी केले आहे.भारताच्या लोकशाही राज्यव्यवस्था आपणास यशस्वी करायची असेल तर त्यासाठी कोणते पूर्वसंकेत आपण पाणी पाहिजे. याची मांडणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली आहे त्यांनी सांगितलेल्या काही महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे:

1. समाजात मोठ्या प्रमाणात विषमता नसली पाहिजे. बाबासाहेबांच्या मते या समाजात मोठ्या प्रमाणात विषमता आहे. त्या समाजात लोकशाही रुजू शकते कारण लोकशाही समानतेवर आधारित आहे व विषमतेमुळे ड्रेस निर्माण होणारे वर्ग वर्गातील संघर्ष तिला असतील करतील समाजातील श्रीमंत लोकांनी आपले विशेषाधिकार सोडले पाहिजे.

2. डॉ.बाबासाहेबआंबेडकरांनी दुसरा महत्त्वाचा मुद्दा सांगितलेला आहे लोकशाहीत कार्यक्रमाचे विरोधी पक्ष असले पाहिजे. सध्याचे सरकार यशस्वी ठरले तर पर्याय सरकार देणारे पक्ष हवे आहेत. सरकारच्या चुकीच्या निर्णयाला विरोध केला पाहिजे. आणि वर्तमानपत्रांनी विरोधी पक्षांनी केलेल्या टीकेला बातम्यांमध्ये स्थान दिले पाहिजे. सरकारच्या चुकीच्या धोरणावर टीका केली पाहिजे.

3. तिसरा महत्त्वाचा मुद्दा त्यांनी सांगितला सर्व नागरिक कायद्यासमोर समान असले पाहिजेत. कायद्याची अंमलबजावणी करताना कोणत्याही प्रकारचा पक्षपात केला जाऊ नये.त्याचप्रमाणे सरकारनेदेखील सर्व नागरिकांना समान लेखले पाहिजे शासनाच्या रोजच्या कामामध्ये मंत्र्याने कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये.

4. चौथा मुद्दा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितला तो म्हणजे लोकशाही म्हणजे बहुमताचे अधिराज्य नव्हे लोकशाहीत बहुतेक निर्णय एकमताने वा संमतीने घेतले गेले पाहिजेत. लोकशाहीत अल्पसंख्यांकाच्या मताला मान आणि महत्त्व दिले पाहिजे. कायदेमंडळात अल्पमतात असणाऱ्या विरोधी पक्षांना विरोध करण्याची तसेच मते मांडण्याची संधी दिली पाहिजे. तशी संधी दिली नाही तर त्यांच्या मनात संसदीय लोकशाही बद्दल तिरस्कार निर्माण होऊ शकतो.

5. लोकशाही यशस्वीतेसाठी आवश्यक असणारे पाचवी बाब म्हणजे सार्वजनिक नीती विवेक. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत होते की आपल्या सार्वजनिक जीवनात सरकारकडून व समाजातील बलवान वर्गाकडून काही सहभागी वर्गावर अन्याय होतात. या अन्यायाविरुद्ध उभा राहून प्रतिकार करण्याच्या वृत्तीला बाबासाहेब नीती विवेक म्हणतात संसद विवेक बुद्धी जागृत ठेवून आपला वर्ग जात वंश यांचा विचार न करता केवळ अन्यायाविरुद्ध उभे राहतात ते लोकशाहीचे समर्थक आहेभारतात जातिव्यवस्थेमुळे अस्पृश्य वर्गात विरुद्ध होणाऱ्या अन्यायाविरुद्ध फार थोडे लोक उभे राहिले पण लोकांनी उभे राहणे गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भाषणाचा समारोप करताना म्हणाले की, आपण आताच स्वतंत्र झालो आहोत आपण राज्यघटना तयार केले आहे. पण लोकशाहीचे रोपटे सगळीकडेच रुजली तसे नाही ते इंग्लंड, अमेरिकेत पोहोचले पण फ्रान्समध्ये खुरटले. व्हर्सायच्याकरारानंतर अनेक लोकशाही सरकारी स्थापन झाली व कोसळली. दुसऱ्या महायुद्धानंतर सीरिया इराण इजिप्त येथे लष्करी हुकूमशाही आल्यात्यामुळे लोकशाहीचे रोप व्यवस्थितरित्या उजवणे आपल्या वाटेतील दगडधोंडे दूर करणे आवश्यक आहे असे मत त्यांनी व्यक्त केले होते.

**सारांश:**

लोकशाही समोरील आव्हानांचा विचार करत असताना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीत केलेले भाषण अत्यंत महत्त्वाचे ठरते. घटना समितीच्या सभेत २५ नोव्हेंबर १९४९ रोजी म्हणजे राज्यघटना मंजूर होण्याच्या आदल्या दिवशी डॉ. आंबेडकर म्हणाले होते, “भारतीय समाजात आज दोन गोष्टींची कमतरता दिसून येते आहे. त्यातील एक म्हणजे समता होय. सामाजिक क्षितिजावर आज स्तरात्मक असमानता आहे. त्यात काही जण वरिष्ठ पातळीवर आणि उरलेले बहुतांश कनिष्ठ पातळीवर आहेत आर्थिक क्षितिजावर मूठभर लोक श्रीमंत आहेत. तर बहुसंख्य अतिशय दारिद्र्याने पिचलेले आहेत २६ जानेवारी १९५० रोजी या राज्यघटनेची अंमलबजावणी करतानाच आपण एका विरोधाभासाच्या नव्या युगात प्रवेश करणार आहोत. राजकीय क्षेत्रात सर्वत्र समता असेल तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात असमानता असेल... अशा विरोधात्मक परिस्थितीत आपण किती काळ राहू शकणार आहोत? किती काळ आपण सामाजिक व आर्थिक समता नाकारू शकणार आहोत? जर

आपण हे फार काळ चालू देणार असलो, तर राजकीय लोकशाहीला विनाशाकडे नेणार आहोत.

जर आपण लवकरात लवकर विरोधाभासाचे वातावरण दूर करू शकलो नाही, तर घटना समितीने परिश्रमपूर्वक तयार केलेली राजकीय लोकशाहीची इमारत जे विषमतेचे बळी ठरतील त्यांच्याकडून उखडली गेल्याशिवाय राहणार नाही." डॉ. आंबेडकरांनी या द्रष्टेपणाने केलेल्या इशाऱ्याकडे आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे. स्वातंत्र्य व समता मिळवण्यासाठी वाटचाल करावी हे घटनेने सांगितले आहे. पण ते आपोआप मिळत नसते. तर ते मिळवण्याची आणि सांभाळण्याची जबाबदारी लोकांवरच आहे. आव्हानांच्या विळख्यात गुदमरणाऱ्या लोकशाहीला लोकच मोकळा श्वास देऊ शकतात. तो देण्याची जबाबदारी स्वीकारणे हे या देशाचा नागरिक म्हणून आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आयुष्यभर राष्ट्रभक्ती व एकात्मता यासाठी सदैव कार्यमग्न होते. हे या देशातील संसदीय लोकशाही चिरकाल अबाधित ठेवण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत ते कृतिशील राजकारणी, समाजकारणी, अर्थतज्ज्ञ,विचारवंत होते.खऱ्या अर्थाने ते भारतीय लोकशाहीचे प्रणेते होते.त्यामुळेच त्यांच्या विषयी आदर व कृतज्ञता व्यक्त करताना लॉर्ड माउंटबॅटन म्हणाले होते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने एक धाडसी योद्धा या देशाला मिळालेला आहे.

**संदर्भसूची-**

1. राजेंद्र व्होरा आणि सुहास पळशीकर, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन, पुणे.2010
2. गायकवाड जयदेव, संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे 2000
3. प्रा. वि. ल. एरंडे, भारतीय लोकशाही अपेक्षा आणि वास्तव, निर्मल प्रकाशन, नांदेड 2000
4. समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टोंबर- डिसेंबर 2016
5. सत्याग्रही विचारधारा, नोव्हेंबर-डिसेंबर 2012